Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – IV July – August 2019

# अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्ययन उपक्रमाचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करतांना येणा-या समस्यांचा अभ्यास.

**प्रा. धनंजय सूर्यकांत वडमारे**
**वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय,जालना.**

**प्रस्तावना :**

सर्व प्राणीमात्रामध्ये मानवप्राणी हा श्रेष्ठ आहे. मानवाचे श्रेष्ठत्व त्याच्या काही वैशिष्टयावरून ठरते. मानवाची २१ व्या शतकात झालेली वाटचाल यातून मानवाचे श्रेष्ठत्व समजते २१ व्या युगाला संगणकीय युग असे संबोधले जाते. संगणकचा शुन्य बुद्धिगुणांक परंतु प्रचंड स्मरणशक्ती असलेल्या यंत्राने जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रवेश केला आहे. शिक्षण क्षेत्रात त्याने आपल्या ठसा उमटविण्यास सुरुवात केली आहे. शिक्षणात विकसित देशात संगणकाचा वापर अधिक प्रभावी ठरला आहे. विकसनशील देशामध्येही संगणकाचा वापर वाढू लागला आहे. संगणकावर सर्व सामान्यांचे जीवन व्यवहार आज थोडया प्रमाणात अवलंबून असले तरी काही दिवसानंतर ते मोठ्या प्रमाणात संगणकाने महत्व व उपयोग जाणून घेणे हे सर्व शिक्षकांना आवश्यकच नव्हे तर अपरिहार्य आहे. हे लक्षात घेवूनच संशोधकाने अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणक साहाय्यक अनुदेशन हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करतांना अडचणी येतात त्याची कारणे शोधणे व त्यावर उपाययोजना करणे. अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणकाच्या साहाय्याने अध्यापन करता येत नाही. का येत नाही? याचा शोध संशोधकाला घ्यावयाचा आहे. तसेच हे जरी प्रात्यक्षिक प्रशिक्षणार्थ्यांना भावी काळात प्रत्यक्ष अध्यापन करायचे आहे. त्यावेळेस संगणकाच्या साहाय्याने अध्यापन करतांना काही अडचणी येवू नयेत यासाठी या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

१) संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्ययन या प्रात्यक्षिक कार्याच्या अंमलबजावणीचा शोध घेणे.
२) संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्ययन या प्रात्यक्षिक कार्यात येणा-या अडचणीचा शोध घेणे.
3) संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्ययन या प्रात्यक्षिक कार्यात येणा-या अडचणीवर उपाययोना सुचविणे.

**संशोधनाची गृहीतके :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी यांना संगणक सहाय्यित अनुदेशनव अध्ययन हे प्रात्यक्षिक कार्य अनिवार्य आहे.
२) प्रत्येक बी.एड. चा विद्यार्थ्यांना MS-CIT हा संगणक कोर्स हा अनिवार्य आहे.
3) प्रशिक्षणाची संगणकाच्या सहाय्याने परिणामकारक अध्यापन करता येते.
४) Power Point च्या स्लाईड तयार करतांना प्रशिक्षणार्थ्यांना अडचणी येतात.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – IV July – August 2019

**संशोधन परिकल्पना :**

संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्ययन हे प्रात्यक्षिक कार्य करतांना छात्र अध्यापकांना अडचणी येतात.

**संशोधनाची कार्यपध्दती :**

प्रस्तुत संशोधनाचे स्वरूप लक्षात घेऊन सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**जनसंख्या :**

उपरोक्त सर्वेक्षणासाठी औरंगाबाद मधील शासकीय अध्यापक महाविद्यालयाची निवड करण्यात आली आहे.

**नमुना निवड :**

अध्यापक महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांची नमूना म्हणून निवड करण्यात आली आहे.

**निष्कर्ष :**

१. अध्यापक महाविद्यालयात संगणक कक्ष उपलब्ध आहे.
२. अध्यापक महाविद्यालयात संगणकाची संख्या आवश्यकते प्रमाणे आहे.
३. संगणकाच्या स्वतंत्र तासिकांचे प्रमाण अत्यल्प दिसुन येते.
४. महाविद्यालयात इंटरनेटची सुविधा आहे.
५. विद्यार्थ्यांना इंटरनेट हाताळता येते.
६. संगणक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना कमी प्रमाणात उपलब्ध झालेले आहे.
७. संगणकाच्या आधारे प्रभावीपणे अध्यापन होते.
८. संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्यापन या संदर्भात कृतीसत्र कमी प्रमाणात राबविले जाते.
९. कृतीसत्रात पोर्ट फोलीयो घटकाविषयी कमी प्रमाणात प्रतिसादकांना माहिती आहे.
१०. कृतीसत्राचे चे आयोजन महाविद्यालयात घेतले जाते.
११. घटक नियोजन आराखडयातील प्राथमिक बाबी विद्यार्थ्यांना माहिती आहेत.
१२. घटक नियोजन आराखडयातील प्राथमिक माहिती भरताना विद्यार्थ्यांना अडचणी येतात.
१३. शिक्षकांनी आराखडा तयार करण्याचे प्रात्यक्षिक कार्य करून दाखवण्याचे प्रमाण कमी आहे.
१४. विद्यार्थीनी तयार केलेला आराखडा मार्गदर्शकाकडून कमी प्रमाणात तपासून घेतला जातो
१५. मार्गदर्शकांच्या सूचनांचा अवलंब पूर्ण प्रतिसादक करतात.
१६. अभ्यासावर आधारित प्रश्न तयार करतांना अडचणी येतात.
१७. घटकांचा सारांश तयार करतांना अडचणी येतात.
१८. विषय क्षेत्र निवडतांना अडचणी येतात.
१९. उद्दिष्टे व अध्ययन निष्पती संदर्भातील अडचणी येतात.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – IV July – August 2019

२०. कार्यपद्धतीचे लेखन करतांना अडचणी येतात.
२१. लागणारे साहित्य निवडतांना अडचणी येतात.
२२. छापोल साहित्य निवडतांना व मिळवतांना अडचणी येतात.
२३. समस्ये संदर्भातील माहितीचे स्त्रोतांकडून माहिती घेतांना अडचणी येतात.
२४. वर्गातील भितन्न क्षमता असणा-या विद्यार्थ्यांचे वर्गीकरण करतांना अडचणी येतात.
२५. विद्यार्थ्याचे मूल्यमापन करतांना अडचणी येतात.
२६. वाक्यरचना करतांना अडचणी येतात.

**शिफारशी:**

**प्राचार्यासाठी शिफारशी :**

१. सी.ए.आय. चे कृतीसत्र महाविद्यालयात सक्तीने आयोजीत करावे.
२. वर्षाच्या सुरुवातील सर्व शिक्षकांना संगणक हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते.
३. संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्यापन या प्रात्यक्षिकाचे सर्व शिक्षकांना प्रशिक्षण आवश्यक कराये.

**शिक्षकांसाठी शिफारशी :**

१. राष्ट्रीय स्तरावर संगणक सहाय्यित अनुदेशन व अध्ययन या प्रात्यक्षिक कार्याच्या कृतीसत्रात सक्तीने सहभाग घ्यावा.
२. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सी.ए.आय. च्या कार्यक्रमाची उपलब्धता करून द्यावी.
३. मार्गदर्शक तासीकाचे आयोजन करावे व योग्य प्रकारे मार्गदर्शन करावे.
४. आठवडयातून २ ते ३ तासिका असाव्यात.

**विद्यार्थासाठी शिफारशी :**

१. विद्यार्थ्यांना संगणकाचा वापर अधिकाअधिक करावा यासाठी वेळ मिळेल तेव्हा संगणक हाताळावे. २. विद्यार्थ्यांनी संगणकाचे अधिकाधिक ज्ञान मिळविण्यासाठी संगणका बद्दलचे पुस्तके वाचावीत.
३. सी.ए.आय. च्या पुस्तकाचे सक्तीचे वाचन करुन आकलन करुन घ्यावे.

**संदर्भ सूची :**

१. भिताडे वि. रा. (सप्टेंबर २००६) शैक्षणिक संशोधन पध्दती नूतन प्रकाशन पूणे.
२. मुळे. रा.रा. आणि उमाठे वि.तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाचे मुलत्वे विद्या बुक्स प्रकाशन औरंगाबाद.
३. जगताप ह. ना. सप्टें-२००६ प्रगत शै. तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान पुणे नित्य नूतन प्रकाशन
४. जोशी शोभना शिराढोणकर मेघना ऑक्टो-२००७ संगणक सहाय्यित अनुदेशन मृणमयी प्रकाशन औरंगाबाद.
५. जाधव ज्ञानेश्वर सोमनाथराव (मार्च २००७) पांरपारिक अध्यापन पध्दती व संगणक अनुदेशन प्रणालीचा विद्यार्थ्यांच्या अध्यापनावरहोणा-या परिणामाचा तौलनिक अभ्यास.